**शिक्षण विशेष समितीची शुक्रवार दिनांक 21.07.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री.दिलीप दिवे यांचे सह मा.सदस्या श्रीमती उज्वला बनकर, मा. सदस्य श्री.राजेंद्र सोनकुसरे, मा.सदस्य श्री.मो.इब्राहीम तौफीक अहमद, मा.सदस्य श्री.विजय झलके, मा.सदस्या श्रीमती दर्शनी धवड आणि विभागाकडून अति.उपायुक्त श्रीमती लाडे, शिक्षणाधिकारी, सहा.शिक्षणाधिकारी, विभागप्रमुख, सर्व शाळा निरीक्षक उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. विषयपत्रिकेवरील विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी आढावा घेण्यास सुरूवात केली.

विषय क्र.1: शालेय पोषण आहार पुर्ववत सुरू ठेवण्याबाबत आढावा घेण्यात आला आणि त्यात संबंधितामार्फत सांगण्यात आले की 140 शाळेला शालेय पोषक आहार देण्यात येतो. दर दिवशी उपस्थित असलेल्या लाभार्थ्याप्रमाणे देण्यात आलेल्या पोषक आहाराविषयीची आकडेवारीचा अहवाल तयार करून शासनाला पाठविण्यात येतो. प्रत्येक दिवशीचा मेनू ठरविण्यात आलेला आहे त्याप्रमाणे शालेय पोषक आहार बचतगटांमार्फत पुरविण्यात येतो.

तद्नंतर मा.सभापती यांनी पोषक आहाराची किंमत, आहाराचा मेनू याबाबतची सर्व माहिती यादीसह मा.सदस्यांना पुरविण्यात यावी असे निर्देशित केले.

विषय क्र.3:–शालेय विद्यार्थ्यांना मोफत बसपास सेवाबाबत माहिती देतांना सांगण्यात आले कि या वर्षी 819 विद्यार्थ्यांचे अर्ज आले त्यापैकी 558 विद्यार्थ्यांना मोफत बसपास देण्यात आल्या. तसेच अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. बसेस ज्या भागात जात नाही त्या भागासाठी शालेय स्तरावर ऑटोरिक्षाची व्यवस्था विद्यार्थ्यांना नेआण करण्यासाठी उदा. दत्तायत्र शाळेच्या विद्यार्थ्यासाठी करण्यात आली. तसेच सायकलीची सुध्दा व्यवस्था करून देण्यात येते असे शिक्षणाधिकारी मार्फत सांगण्यात आले.

मा.सभापती यांनी निर्देशित केले की या योजनेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये. योग्यारित्या याची अंमलबजावणी करण्यात यावी.

विषय क्र.4:–शाळा व झोनस्तर पटनोंदणी अहवालाबाबत आढावा घेत असतांना शाळा निरीक्षक आकडेवारी देतांना गोंधळून गेले त्यामुळे मा.सभापती यांनी निर्देशित केले की चुकीची माहिती देण्यात येवू नये सर्व माहिती पडताळून मगच सांगण्यात यावी.

विषय क्र.5:–घडयाळी तासिका शिक्षकांबाबत आढावा घेतला असता 30 तासिका शिक्षक घेतले असल्याचे संबंधितांमार्फत सांगण्यात आले. सन 2009–10, 2010–2011 च्या रिक्वॉयमेंटप्रमाणे शिक्षक घेण्यात आले आहे. वर्तमानपत्रात जाहिरात देवून त्यानुसार अपाईटमेंट करून घेतल्या

असेही सांगण्यात आले. त्यात जुन्याच शिक्षकांना पुन्हा घेण्यात आले असल्यामुळे भविष्यात प्रश्नचिन्ह निर्माण होवू शकतो असे अधिक्षक शिक्षण विभाग यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी विभागाला निर्देशित करतांना सांगितले की विभागाला बी.एड. मेथडचे किती शिक्षक आहेत आणि विज्ञान, गणित, आर्ट या शाखेचे किती शिक्षक किती आहेत याची माहिती त्यांच्या विषयानुसार देण्याविषयी विभागाला सुचित केले असतांना अद्यापपावेतो त्याची माहिती देण्यात आलेली नाही. ज्या मेथेडचे शिक्षक आहेत त्या मेथेडप्रमाणे तो शिक्षक त्या शाळेला देण्यात यावा याप्रमाणे चार्ट तयार करण्यात यावा आणि ज्या ज्या शाळेची ज्या शिक्षकांची मागणी आहे त्याप्रमाणे त्या शाळेला शिक्षक देण्यात यावा. तसेच घडयाळी तासिका नवीन शिक्षक घेतांना कायदयाच्या सल्लागाराचा सल्ला घेण्यात यावा.

विषय क्र.6:–नर्सरी, के.जी.1, के.जी.2 च्या मुलांना मोफत पुस्तके देण्याबाबत आढावा घेतला असता शिक्षणाधिकारी मार्फत सांगण्यात आले की तीन पुस्तक प्रकाशनचे संच आलेले आहे त्यातुन निवड करण्याची प्रकिया करण्यात येईल.

विषय क्र.7:–झोनस्तरीय प्राथमिक,माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांनी व शाळा निरीक्षकांनी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व बॅकेचे खाते बुक काढण्याकरीता, झोन निरीक्षकांनी प्रत्येक शाळेचा स्वतंत्र आढावा देण्यात आला असता लक्ष्मीनगर झोन क्र. 1 मध्ये 11 शाळा असून एकुण 1546 विद्यार्थी आहेत आणि 1273 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यात आले असून 1246 विद्यार्थ्यांचे खाते उघडण्यात आले असून 279 विद्यार्थ्यांचे आठ दिवसात बॅक खाते उघडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. धरमपेठ झोन क्र. 2 मध्ये 11 शाळा असून एकुण 1265 विद्यार्थी आहेत आणि1206 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढले असून 528 विद्यार्थ्यांचे बॅक खाते काढले आहे. हनुमाननगर झोन क्र. 3 मध्ये 11 शाळा असून एकुण 1280 विद्यार्थी आहेत. 992 विद्यार्थ्यांचे बॅक खाते उघडले असून 1007 विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यात आले आहेत. धंतोली झोन क्र. 4 मध्ये 8 शाळा असून एकुण विद्यार्थी 743 आहेत. 424 बॅक खाते उघडले असून 521 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढलेले आहे. नेहरूनगर झोन क्र.5 मध्ये 15 शाळा असून 1172 एकुण विद्यार्थी आहेत. 416 विद्यार्थ्यांचे बॅक खाते उघडले असून 493 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यात आले आहे. गांधीबाग झोन क्र. 6 मध्ये एकुण 19 शाळा असून एकुण 2609 विद्यार्थी आहेत. 1321 विद्यार्थ्यांचे बॅक खाते आणि 1824 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यात आलेले आहे. संतरंजीपुरा झोन क्र. 7 मध्ये 27 शाळा असून एकुण विद्यार्थी 1887 आहेत. बॅक खाते 1212 विद्यार्थ्यांचे काढले असून 1514 आधारकार्ड काढण्यात आले आहे.लकडगंज झोन क्र. 8 मध्ये 30 शाळा असून 5966 एकुण विद्यार्थी आहेत. 3095 विद्यार्थ्यांचे बॅक खाते आणि 4321 विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढलेले आहे 1500 खाते प्रोसेसमध्ये आहेत. संजयनगर माध्यमिक शाळा आणि मिनीमाता नगर हिंदी शाळेत 99 टक्के विद्यार्थ्यांचे बॅक खाते आणि आधारकार्ड काढण्यात

आलेले नाही. बहुतेक शाळा निरीक्षकांनी मुख्याध्यापकांना नोटीस दिलेले आहेत आणि त्यांचे स्पष्टीकरण सुध्दा आलेले आहे. अशी माहिती देण्यात आली.

विषय क्र.2:–विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्याबाबत

मा.सभापती यांनी निर्देशित केले की गणवेश हा अत्यंत गंभीर विषय असून सुध्दा मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या विद्यार्थ्यांचे 50 टक्के सुध्दा बॅकेत खाते उघडले गेले नाही. ज्या काही अडचणी असतील ते अपर आयुक्त आणि समितीला कळविण्यात यावे असे सांगून सुध्दा त्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची मागणी करण्यात आली नाही. ज्या मुख्याध्यापकांना शाळा निरीक्षकांकडून तीन शोकॉज नोटीस गेलेले आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही संबंधित अधिका–यामार्फत करण्यात आली ते समितीला कळविण्यात यावे. तसेच 90 टक्केच्या वर ज्या शाळेत विद्यार्थ्यांचे बॅक खाते आणि आधारकार्ड काढण्यात आले त्याचा सत्कार सुध्दा करण्यात यावा. येत्या आठ दिवसात या विषयाच्या अनुषंगाने विचारणा करण्यात येईल आणि हा संपुर्ण विषय अति.उपायुक्तासमोर ठेवण्यात येईल असे त्यांनी सुचित केले.

विषय क्र.8:–शालेय शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी तज्ञ समितीची नियुक्तीबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी सांगितले की 36 प्रश्नाचा एक फॉरमेट तयार करण्यात आला आहे. या फॉरमेटप्रमाणे शाळा निरीक्षकांनी त्या त्या शाळेतील माहिती गोळा करावयाची आहे. ही माहिती जमा झाल्यानंतर कुठल्या शाळेमध्ये कुठल्या गोष्टीची आवश्यकता आहे. त्यानुसार त्या शाळेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल याकरिता एक तज्ञ लोकांची समिती गठीत करण्यात येईल याकरिता येत्या 10 दिवसात हा फॉरमेटमध्ये रितसर आढावा घेवून माहिती भरून विभागाला जमा करण्यात यावी असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्र.9:–वाल्मीकीनगर शाळेतील चपराश्यांची शाळेतर्फे करण्यात आलेल्या तक्रारीबाबत चर्चा केली असता वाल्मीकीनगर शाळेतील चपराश्याचे प्रकरण विधी समितीकडे पाठविण्यात यावे. आलेल्या कार्यवाहीनुसार प्रस्ताव तयार करून शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा त्यावर त्यानंतरची कार्यवाही करण्यात येईल असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्र.10:– अध्यक्ष परवानगीने येणारे इतर विषयामध्ये ताजाबाद उर्दू माध्यमिक शाळेच्या एका शिक्षकाला अंजनगावसुर्जीच्या शाळेत बदली करून जावयाचे आहे. या प्रकरणी प्रस्ताव तयार करून समितीपुढे ठेवण्यात यावा. समितीत मंजूर झाल्यानंतर महासभेपुढे ठेवण्यात येईल असे मा.सभापती यांनी संबंधितांना निर्देशित केले.

म.न.पा.च्या 14 शाळेमध्ये कला क्षेत्राकरिता शिक्षकांची नियुक्ती बाबत चर्चा होवून ताबडतोब म.न.पा.च्या 14 शाळेमध्ये कला क्षेत्राकरिता शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी आणि

अतिथी निर्देशक पथक तयार करण्यात यावे ज्या शाळेमध्ये पथक तयार झालेले आहे त्याचा आढावा शिक्षणाधिकारी यांच्याकडे देण्यात यावा असे मा.सभापती यांनी निर्देशित केले

शेवटी मा.सभापती यांनी गणवेशाच्या संदर्भातील विषय फार गंभीर असून विधानसभेत सुध्दा गणवेशाच्या बाबतीत तारांकित प्रश्न विचारण्यात आला असून गणवेशाच्या बाबतीत विद्यार्थ्यांचे आधारकार्ड आणि बँक खाते उघडले गेले नाही तर कायदेशिर कार्यवाहीस सुध्दा होवू शकते आणि याला मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा निरीक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षण समितीचे पदाधिकारी सुध्दा जबाबदार राहणार आहे करिता शालेय गणवेशाच्या अनुषंगाने बँक खाते आणि आधारकार्ड काढण्याविषयी लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी. मा. सदस्य मो.इब्राहीम तौफीक अहमद यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या शाळेमध्ये मुख्याध्यापक दिलेले नाहीत त्याकरिता प्रस्ताव तयार करून पाठविण्यात यावा. मा.सदस्या श्रीमती धवड यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रभागातील कोणत्या शाळेत किती विद्यार्थी आहेत याची एक यादी त्यांना देण्यात यावी. मा.सदस्या श्रीमती बनकर यांनी जयताळा शाळेत असलेल्या तांदुळाच्या पुरवठाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत संबंधितांनी कार्यवाही करावी. सभेत देण्यात आलेल्या सुचनांना प्राथमिकता देवून काम करण्यात यावे असे निर्देशित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
शिक्षण विशेष समिती

म.न.पा.ठराव क्रमांक 8 दिनाक 20.3.2017 अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3) नुसार गठीत शिक्षण विशेष समितीची सभा सोमवार दिनांक 30.10.2017 रोजी सकाळी 11.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती ,स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती शिक्षण विशेष समिती प्रा श्री दिलीप वामनराव दिवे मा. जेष्ठ सदस्य श्री दयाशंकर तिवारी, मा. सदस्या श्रीमती स्नेहल बिहारे, मा. सदस्य श्री विजय झलके, मा. सदस्य श्री राजेन्द्र सोनकूसरे, मा. सदस्या श्रीमती प्रमिला मंथरानी मा. सदस्या श्रीमती उज्वला बनकर, मा. सदस्य मो. इब्राहिम अहमद तथा मा. उप निगम आयुक्त श्रीमती लाढे, शिक्षणाधिकारी तथा इतर अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती शिक्षण समिती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

समिती समोर विचारार्थ असलेल्या विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात आली त्याप्रमाणे विषय क्रमांक 1 नुसार म.न.पा विद्यार्थ्यांच्या गणवेश व डी.बी.टी. कार्डबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी विभागातर्फे गणवेश देण्यात आल्याची माहिती देण्यात आली तथा डी.बी.टी. कार्ड संदर्भात कार्यवाही सुरु असल्याबाबत सांगण्यात आले.यानंतर डी.बी.टी. कार्ड व्दारेच पेमेंन्ट करण्यात येईल ही माहितीही यावेळी देण्यात आली.

विषय क्रमांक 2 नुसार प्रत्येक शाळा निरीक्षकांना 16–16 शाळा वाटप केल्याबाबत विचार विनिमयाच्या विषयावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली यावर सभापती यांनी प्रत्येक निरिक्षकाने त्यांच्या शाळेत काय अडचणी आहे माहिती गोळा करावी तथा नियमित या बाबत अहवाल प्रस्तुत करण्यात यावा असे निर्देशित केले.

विषय क्रमांक 3 नुसार माध्यमिक शिक्षकांची सेवाजेष्ठता यादीबाबत आढावा. या संदर्भात विभागाव्दारे सांगण्यात आले की 28.7.2017 ला या बाबत निर्देश देण्यात आलेले आह`.याबाबत पत्राची सत्यप्रत सभापती यांना देण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 4 नुसार निवासी वस्तीगृह म.न.पा. तर्फे चालविण्याकरिता व इतर कामाकरिता शिक्षण विभागाच्या सन 2017–18 च्या अंदाजपत्रकात महासभेने पद क्रमाक ऐ45802073008 या लेखा शिर्षामध्ये रुपये 50 लाख तरतुद मंजूर केलेले आहे. या विषयावर चर्चा करण्यात आली 14 वर्षावरील 18 विद्यार्थ्यांच्या व्यवस्थेकरीता बालकल्याण समितीकडे शिक्षण विभागाने विश्वहिंन्दु परिषदेच्या शिफारशीनुसार प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहे 6 ते 14 वर्ष वयोगटातील निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांकरीता 1 आक्टोंबर 2017 पासून त्यांच्या व्यवस्थेकरीता उपरोक्त तरतुदी मधून अंदाजे खर्च 7.00 लक्ष भागविण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे. मंजूर तरतुदीतील अंदाजे उर्वरित 43.00

लक्ष निवासी वस्तीगृहाच्या (लालस्कूल) यांच्या दुरुस्ती व देखभाली करीता झोन कार्यालया मार्फत प्रस्ताव तयार करुन सादर करण्याच्या सूचना विभागास देण्यात आल्या आहेत.

विषय क्रमाक 5 नुसार मागील वर्षी मा. नगरसेवकांनी प्रत्येकी एक शाळा दत्तक देण्यात आलेल्या शाळांचा अहवाल सादर करण्याबाबतच्या विषयावर विभागाव्दारे माहीती देण्यात आली की यासंबंधात काही मा. सदस्यांकडून प्रतिसाद मिळालेला नव्हता यावर सर्व मा. सदस्यांना त्यांच्या क्षेत्रातील शाळांना दत्तक घेण्यासंबंधात पत्र पाठविण्याबावत सागण्यात आले.

विषय क्रमांक 6 नुसार वंद झालेल्या शाळेतील डुप्लीकेट टी.सी. देण्याकरिता शालेय दाखल रजिस्टर वरील जुने रेकॉर्ड स्कॅनिंग करुन ठेवण्याबावत वियार विनिमय करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली या कामाकरीता अतिरिक्त शिक्षकांची मदत घेण्यात यावी स्कॅनींगचे काम तथा योग्य वितरण व्यवस्था ही 2 महिन्यात करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 7 नुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टिने शाळेत उपाययोजना करण्याबावत विचार विनिमय. या विषयावर शाळेला कम्पोंड वॉल, सेक्युरीटी गार्ड, किंवा कर्मचारी व्दारे सुरक्षा, तसेच पुर्वी प्रमाणे कर्मचा–यांना शाळेच्या क्वॉटर मध्ये ठेवून सुरक्षिततेची जवावदारी देणे, सी.सी.टी.व्ही कॅमेराची व्यवस्था करणे इत्यादी उपायांचा उपलब्धतेनुसार व्यवस्था करण्यावावत चर्चा करण्यात आली. या संवधात उचित कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 8 नुसार म.न.पा. शाळेत सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याकरिता ज्या शाळेत सुरक्षा रक्षक नाहीत अशा शाळांची यादी सादर करुन आढावा घेण्यावावत. विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी या संदर्भात असलेल्या प्रस्तावात सुधार करण्यात आल्यावावत माहिती देण्यात आली. या संदर्भात सर्व निरिक्षकांनी या शाळेचे अहवाल तयार करावे तसेच विनंतीपत्र आयुक्तांना द्यावे असे सभेत निर्देश देण्यात आले.

विषय क्रमांक 9 नुसार शिक्षण सप्ताह व बालक दिन कार्यक्रमावावत विचार विनिमय करण्यावावत च्या विषयावर विभागाव्दारे सांगण्यात आले की जवळ असलेल्या शाळेतील मुले कार्यक्रमाला उपस्थित राहतात दुर असणा–या मुलांना उपस्थितेकरीता वाहनांची सोय उपलब्ध झाल्यास कार्यक्रम योग्य रित्या रावविता येइल या करीता परिवहन विभागाशी चर्चा करुन उपलब्धता करण्यावावत कार्यवाही करण्यात यावी. असे निर्देशित करण्यात आले तसेच अश्या प्रकारच्या कार्यक्रमात संपूर्ण भारत दर्शन होईल अश्या कार्यक्रमाला सम्मीलीत करण्यात यावे मा. नगरसेवकांना यात सम्मीलीत करण्यात यावे मा. नगरसेवकांना शिक्षकांच्या माध्यमातुन सुचना करण्यात याव्या असे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 10 नुसार दुर्वल घटक समिती पदांतर्गत निधी दुर्वल घटकातील विद्यार्थ्याकरिता व इतर विद्यार्थ्यांना शिक्षण विभाग पदांतर्गत निधी मधुन वर्ग 1 ते 12 मधील सर्व विद्यार्थ्यांना स्वेटर देण्याबावत विचार विनिमय. करण्यावावतच्या विषयावर सर्व

आववश्यक तेथे पत्र देवून नियमानुसार परवानगी घ्यावी प्रस्ताव तयार करण्यात यावा असे सुचविण्यात आले.

विषय कमांक 11 नुसार म.न.पा. शाळेची बंद झालेली शाळा श्री साईवाबा सेवा मंडळ व म.न.पा. यांच्या संयुक्त विद्यमानाने सुरु करण्यावावत विचार विनिमय.या करीता परवानगी नियमानुसार घ्यावी लागेल त्या संवंधात योग्य कार्यवाहीचे निर्देशित करण्यात आले.

विषय कमांक 12 नुसार आदर्श शिक्षक पुरस्काराची राशी निश्चित करण्यावावत. विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी राशी देण्याऐवजी मेडल हे सिल्वर तथा निश्चित वजनाचे देण्यात यावे असे सभेत निश्चित करण्यात आले.

विषय कमांक 13 अध्यक्षाच्या परवानगीने येणारे इतर विषय.यावर चर्चा करतांना सर्व शिक्षकांनी स्थानीय नगरसेवकांची शाळेच्या व्यवस्थे संवंधात प्रत्यक्ष भेट, घ्यावी चर्चा करावी असे निश्चित करण्यात आले.

महानगरपालिकेच्या शाळेत तीन किलोमिटरच्या लांवुन येणा–या विद्यार्थ्यांनकरीता सायकल उपलब्ध करण्याकरीता व यास्तव सायकल वॅक तयार करण्यात यावे आवश्यक अश्या सर्व विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले.

सभेत समितीतर्फे विचार व्यक्त करण्यात आले की अन्य खाजगी शाळा तथा सरकारी शाळेत शिक्षक आपल्यातर्फे शाळेच्या उत्थानाकरीता शाळेला सुविधा पुरवितात त्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षकांनी या दृष्टिने विचार करावा असे सुचविण्यात आले.

शिक्षकांचे नियमानुसार करण्यात येणारे डिजीटल प्रशिक्षण हे लवकर सुरु करण्यात यावे. प्रत्येक शाळेच्या कमीत कमी 2 शिक्षकांना याचे प्रशिक्षण देण्यात यावे असे सभेत निर्देशित करण्यात आले.

यावेळी सेवानिवृत्त काही शिक्षकांना थकवाकी देण्यावावतच्या विषयावर चर्चा करण्यात आली यावावत पुढील कार्यवाही करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले.

यानंतर सभापती यांनी सभेची कार्यवाही समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
शिक्षण विशेष समिती

**शिक्षण विशेष समितीची शुक्रवार दिनांक 05.01.2018 रोजी सकाळी 11.30 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री.दिलीप दिवे यांचे सह मा. उप सभापती श्रीमती स्नेहल बिहारे, मा. सदस्या श्रीमती उज्वला बनकर, मा.सदस्य श्री.राजेंद्र सोनकुसरे, मा.सदस्य श्री.विजय झलके, मा.सदस्या श्रीमती प्रमिला मंथरानी आणि विभागाकडून उपायुक्त डॉ. रंजना लाडे, शिक्षणाधिकारी, सर्व शाळा निरीक्षक आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. विषयपत्रिकेवरील विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी आढावा घेण्यास सुरूवात केली.

विषय क्र.1:–म.न.पा.विद्यार्थ्यांच्या डी.बी.टी.कार्ड देण्याबाबत आढावा घेतला असता संबंधितामार्फत सांगण्यात आले, एकुण 22767 विद्यार्थ्यांपैकी 10847 विद्यार्थ्यांचे डी.बी.टी.कार्ड ॲक्टीवेट झालेले आहे. त्यापैकी 3231 विद्यार्थ्यांचे पेमेंट ॲक्टीवेट झालेले आहे. बाकी कार्ड ॲक्टीवेट होण्याची प्रक्रिया 15–20 दिवसात होवून जाईल.

डी.बी.टी.कार्ड ॲक्टीवेट झाल्यानंतर मुख्याध्यापकाकडे जातील आणि त्यांच्यामार्फत त्या–त्या पुरवठादाराकडे कार्ड स्वॅप केले जातील असे ठरले असतांना आतापर्यंत कार्डद्वारे पेमेंट कां झाले नाहीत अशी विचारणा करून मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, डे टू डे बॅंकेला किती कार्डाचा डाटा पाठविला जातो याची माहिती देण्यात यावी. तसेच लवकरात लवकर डी.बी.टी.कार्ड ॲक्टीवेट करण्यात यावे.

विषय क्र.2:–सायकल बॅंक योजनेबाबत केलेल्या कार्याचा आढावा घेवून मा. सभापती यांनी निर्देशित केले की 30.10.17 च्या शिक्षण समितीच्या बैठकीत महानगरपालिकेच्या शाळांतील गरीब आणि गरजू विद्यार्थी जे दूरवरून पायी शाळेत येतात अशा विद्यार्थ्यांना मोफत सायकलचा लाभ घेता यावा याकरिता सायकल बॅंक योजनेबाबत ठराव मंजूर केल्यानंतरही विभागाकडून अपेक्षित कार्यवाही झालेली नाही. करिता विभागाने लवकरात लवकर कार्यवाही पुर्ण करावी.

विषय क्र.3:– माध्यमिक शिक्षकांची सेवाजेष्ठता यादीबाबत केलेल्या कार्याचा आढावा घेतला असता संबंधितांमार्फत सांगण्यात आले की सेवाजेष्ठता यादीत एकुण 350 शिक्षक असून 325 शिक्षकांची यादी तयार करण्यात आलेली आहे. सेवाजेष्ठता यादी तयार करतांना बरेच अडचणीचा सामना करावा लागत आहे असे सांगण्यात आले असता मा.सभापती यांनी निर्देशित केले की शिक्षकांची सेवापुस्तिका मागवून दि.4.01.2018 पर्यंत सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात यावी असे निर्देशित केले असतांना सुध्दा विभागामार्फत अद्याप कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली नाही. कार्यालयाने याकडे लक्ष केंद्रीत करून सेवाजेष्ठता यादी तातडीने तयार करावी.

विषय क्र.4:–डुप्लीकेट टी.सी.देण्याकरिता जुने रेकॉर्ड स्कॅनिंग करण्याबाबत केलेल्या कार्याचा आढावा घेतला असता ज्या शाळेचा रेकॉर्ड आहे त्याची यादी तयार करून सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला आहे असे सांगण्यात आले. मा.सभापती यांनी या अनुषंगाने निर्देशित केले की डुप्लीकेट टी.सी.देण्याकरिता जुने रेकॉर्ड स्कॅनिंग करण्याबाबतच्या प्रक्रियेला वेग देण्यात यावा.

विषय क्र.5:–नागपूर शहरातील 32 वाचनालय व 75 अध्ययन कक्ष चालविण्याकरिता ग्रंथालय विभागात शासकीय अनुदानाची तरतूद नसल्यामुळे शिक्षण समितीपुढे या विषयावर निर्णय घेण्याबाबत विचार विनिमय करून ग्रंथालयाचा विषय शिक्षण विभागाशी संबंधित नाही असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्र. 6:– म.न.पा.च्या बंद असलेल्या शाळा ज्या संस्थांना देण्यात आलेल्या आहेत त्यांचे भाडे निर्धारण व फेरमुल्यांकनाबाबत विचार विनिमय नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्र.7:–वर्ग 1 ते 12 मधील विद्यार्थ्यांना स्वेटर देण्याबाबत केलेल्या कार्याचा आढावा घेतला असता या विषयाला 21 तारखेला स्थायी समितीची मंजूरी मिळाली तद्नंतर 30 तारखेला आयुक्तांनी स्वाक्षरी झाल्यानंतरही निविदा काढण्याच्या कामी वारंवारं सूचना देवूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास आले असून याबाबत संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी असे मा.सभापती यांनी निर्देश दिले.

विषय क्र.9:–वर्ग 10 वी व 12 वी विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमा संबंधिचा अहवाल तसेच शाळा निरीक्षकांनी भेट दिलेल्या शाळा संबंधिचा मागील सभेपासुन या सभेपर्यंतचा अहवाल सादर करण्याबाबत मा.सभापती यांनी झोनवाईज आढावा घेण्यास सुरूवात केली आणि झोनवाईज किती शाळांना शाळा निरीक्षकांनी भेटी दिल्या. दैनंदिन पुस्तिका, मासिक अहवाल आणि वार्षिक अहवाल बघितले गेले काय? बघितल्यानंतर त्यावर स्वाक्षरी केली काय?या संबंधी झोनवाईज विचारणा केली.

लक्ष्मीनगर झोन क्र.1 :– एकुण 16 शाळा असून 164 भेटी दिलेल्या आहेत. त्यापैकी 6 शाळेंनी दैनंदिन टाचणवही काढलेल्या नाहीत. चिंचभवन येथील शाळेतील 3 शिक्षकांनी, खामलानगर येथे 3 शिक्षकांनी तर सुभाषनगर शाळेतील 3 शिक्षकांनी, परसोडी येथील 5 शाळेच्या शिक्षकांनी तर जयताळा येथील 5 शिक्षकांनी दैनंदिन टाचणवही काढलेल्या नाही.

धरमपेठ झोन क्र.2:–एकुण 16 शाळा आहेत. 6 शाळेला भेट दिलेली आहे. 2 शाळेमध्ये दैनंदिन टाचणवही आहे. 4 शाळेत दैनंदिन टाचणवही दाखविण्यात आली नाही. मासिक आणि वार्षिक नियोजन अहवाल गांधीनगर शाळेत 5 शिक्षकांनी तयार केलेला नाही. गोकुळपेठ शाळेत 5

शिक्षकांनी, रामनगर शाळेत 3 शिक्षकांनी, रविनगर शाळेत 4 शिक्षकांनी सुरेंद्रगढ शाळेत एका शिक्षकांनी तयार केलेला आहे तर 3 शिक्षकांनी तयार केलेला नाही.

हनुमाननगर झोन क्र. 3:– एकुण 15 शाळा आहेत. प्रत्येक शाळेला 5 ते 6 भेटी दिलेल्या आहेत. प्रत्येक शाळेमध्ये दैनंदिन टाचणवही आहे आणि त्यावर सहया केलेल्या आहे. मासिक आणि नियोजन अहवाल असून त्यावर सहया केलेल्या नाही.

धंतोली झोन क्र.4:– एकुण 15 शाळा आहे. एकुण 60 भेटी झालेल्या आहेत. 85 शिक्षकांपैकी 20 शिक्षकांनी दैनंदिन टाचणवही तयार केलेली नाही. मासिक नियोजन अहवाल 10 शाळेनी तयार केलेला नाही. वार्षिक नियोजन अहवाल 10 शाळेनी तयार केलेला नाही.

नेहरूनगर झोन क्र. 5:– एकुण 11 शाळा आहेत त्यापैकी 4 शाळेने दैनंदिन टाचणवही तयार केलेली नाही आणि 3 शाळेने मासिक नियोजन अहवाल तयार केलेला नाही तर 3 शाळेने वार्षिक अहवाल तयार केलेला नाही.

गांधीबाग झोन क्र.6:– एकुण 19 शाळा असून 105 शिक्षक आहेत 90 भेटी झाल्या आहेत. 11 शाळेत दैनंदिन टाचणवही तयार केलेली नाही. मासिक व वार्षिक नियोजन अहवाल तयार केलेला आहे परंतु सहया केलेल्या नाही.

सतरंजीपुरा झोन क्र.7:–एकुण 15 शाळा असून 104 शिक्षक आहेत. 64 भेटी दिलेल्या आहेत. 12 शिक्षकांकडे दैनंदिन टाचणवही तयार केलेली आहे. मासिक व वार्षिक नियोजन अहवाल तयार केला असून सहया केल्या आहेत.

लकडगंज झोन क्र.8:– एकुण 16 शाळा असून 216 शिक्षक आहेत. 5 शाळेमध्ये दैनंदिन टाचणवही तयार केलेली आहे 21 शिक्षकांनी दाखविले नाही. 117 शिक्षकांच्या दैनंदिन टाचणवहीवर सहया केलेल्या नाहीत.

आसीनगर झोन क्र.9:–एकुण 18 शाळा असून 106 शिक्षक आहेत. प्रत्येक शाळेला 5–5 भेटी दिल्या आहेत. दैनंदिन टाचणवही तयार केलेली असून सहया केलेल्या आहेत. मासिक आणि वार्षिक नियोजन अहवालावर सहया केल्या आहेत. कामगार नगरच्या शाळेला 2 भेटी दिल्या आहेत.

मंगळवारी झोन क्र.10:–एकुण 15 शाळा असून 103 शिक्षक आहेत. 48 शिक्षकांनी दैनंदिन टाचणवही तयार केलेली नाही. 55 शिक्षकांनी तयार केले आहे. मासिक आणि वार्षिक नियोजन अहवाल तयार केला असून त्यावर सहया केल्या आहेत.

घेतलेल्या आढावा दरम्यान आलेल्या माहितीवर मा.उपायुक्त डॉ.रंजना लाडे यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की शाळा निरीक्षकांच्या वारंवारं बैठका घेवून शाळांना

भेटी देण्यासंदर्भात आणि दैनंदिन टाचणवही, मासिक व वार्षिक नियोजन अहवालावर सही करण्यास सुचित करण्यात आले असतांनाही शाळा निरीक्षकांनी शाळांना भेटी दिलेल्या नाहीत असे आढळून येत आहे. याबद्दल यांचेवर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यात यावे.

तद्नंतर मा.सभापती यांनी निर्देशित केले, ज्या ज्या शिक्षकांनी दैनंदिन टाचणवही, मासिक व वार्षिक नियोजन अहवाल तयार केलेला नाही. अशा शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावा आणि ज्या शाळा निरीक्षकांनी दैनंदिन टाचणवही मासिक व वार्षिक नियोजन अहवालावर सही केल्याचे सांगितले त्याची प्रत मागवून तपासण्यात यावे.

विषय क्र. 10ः–शिक्षण सप्ताह कार्यक्रमाबाबत विचार विनिमय व आढावा घेतला असता मनपाच्या शिक्षण विभागातर्फे 9 जानेवारीपासून झोन स्तरावर आणि केंद्रीय स्तरावर शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे शिक्षणाधिकारी यांनी माहिती दिली.

विषय क्र.11ः–म.न.पा.माध्यमिक शाळेकरिता डेस्क बेंच खरेदीबाबत आढावा घेतला असता 600 डेस्क बेंच खरेदीबाबत प्रस्ताव तयार केलेला असून निविदा प्रक्रिया करण्यात येत असल्याचे विभागामार्फत सांगण्यात आले. तसेच मागील वर्षी काढण्यात आलेल्या परंतु तांत्रिक कारणाने रद्य झालेल्या निविदेतील डेक्स बेंचचा नमुना व स्पेसिफीकेशन (एफ.आर.पी) या वर्षीचे निविदेकरीता कायम ठेवुन त्या आधारे निविदा प्रक्रीया करण्यास मंजूरी देण्यात आली.

मा.सभापती यांनी निर्देशित केले, म.न.पा.माध्यमिक शाळेकरिता डेस्क बेंच खरेदीबाबत 15 दिवसांत निविदा काढण्यात यावी.

विषय क्र. 12ः– म.न.पा.शाळेत सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याबाबतचा आढावा घेतला असता सुरक्षा रक्षक नियुक्ती संदर्भात सुधारित प्रस्ताव सा.प्र.वि. कडे पाठविण्यात आल्याचे विभागामार्फत सांगण्यात आले.

विषय क्र.13ः–अध्यक्ष परवानगीने येणा–या विषयात म.न.पा.शाळेत बायोमेट्रीक मशीन लावण्यासंदर्भात मा.सभापती यांनी माहिती घेतली आणि तद्नंतर सुचित केले की बायोमॅट्रीक मशीन लावण्यासंदर्भात समितीमध्ये ठराव पास करण्यात आला. दि.25.11.2017 पासून सीएफसी विभाग प्रमुख श्री.कांबळे यांचेकडे नस्ती गेलेली असून अद्यापपावेतो निविदा काढण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही. निविदा प्रक्रियेला इतका वेळ लागण्याचे कारण काय? याबाबत समितीमार्फत संबंधितांना विचारणा करणारे पत्र देण्यात यावे असे मा.सभापती यांनी निर्देशित केले.

तद्नंतर नागपूर महानगरपालिकेच्या प्रियदर्शिनी उच्च मराठी प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीतील विद्यार्थी राहुल सहारे हयाने राष्ट्रीय स्तरावर खो–खो स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. मनपाच्या शिक्षण समितीचे सभापती प्रा.दिलीप दिवे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.

शेवटी मा.सभापती यांनी सांगितले कि सभापती, समिती सदस्य मा. विजय झलके, मा. सदस्य श्री.राजेंद्र सोनकुसरे या त्रिसदस्यीय समिती सदस्यांनी 2 जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेवून केंद्रीय विद्यालयाच्या प्रस्तावासंदर्भात चर्चा केली. ना.गडकरी यांनी तातडीने या संदर्भात केंद्रीय मानव संसाधन व मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांच्याशी चर्चा केली. यानंतर मनपाच्या त्रिसदस्यीय समितीने संसद भवनात ना.प्रकाश जावडेकर यांची भेट घेवून नागपूरात सात केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासंदर्भात चर्चा केली आणि निवेदनही दिले. त्यावर त्यांनी येत्या शैक्षणिक सत्रापासून केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचे आश्वासन समितीला दिल्याचेही त्यांनी सांगितले. येणा—या काळामध्ये नागपूर महानगरपालिका आणि केंद्र सरकार संचालित केंद्रीय विद्यालय उघडण्यात येतील असे सांगून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
शिक्षण विशेष समिती